


परळी **संघर्षनेता**

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे




बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 95 | बुधवार दि. 29 एप्रिल 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# लातूर जिल्ह्यात उष्माघाताचा चौथा बळी; 75 वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू,

## अकोल्यात सर्वाधिक 47 अंश तापमान





लातूर : यंदाच्या उन्हाळ्यातही एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कडक उन्हाचा कहर जाणवत असून विदर्भ आणि मराठवाड्यात तापमान चांगलंच वाढलं आहे. उष्माघातामुळे काही ठिकाणी मृत्यू झाल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. लातूर (Latur) जिल्ह्यातही मे महिन्याच्या सुरुवातीआधीच उष्माघाताच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असून आज आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे 75 वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून उष्माघाताने त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात उष्माघातामुळे मृतांचा आकडा आता चारवर पोहोचला आहे.

मृत शेतकऱ्याचे नाव त्र्यंबक नारायण बेळंबे असे असून दुपारी साडेबारा ते एकच्या सुमारास ते स्वतःच्या शेतात जनावरांसाठी चारा कापत असताना अचानक त्यांना चक्कर आली आणि ते खाली कोसळले. त्यांना तात्काळ पानचिंचोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यापूर्वी जिल्ह्यात उष्माघातामुळे मृत्यू झाल्याच्या तीन घटना समोर आल्या होत्या.

औसा तालुक्यातील एरंडी गावात 25 वर्षीय महेश लिंबाजी इंगोले या तरुणाचा शेतातील कामावरुन घरी आल्यानंतर चक्कर येऊन मृत्यू झाला होता. तर, औसा तालुक्यातील गोंद्री येथे नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. आणखी एका घटनेत औराद शहाजनी येथे 60 वर्षीय शेतकऱ्याचाही प्रखर उन्हामुळे मृत्यू झाला होता. पान 3 वर

# भाजपकडून विधानपरिषदेसाठी 5 उमेदवारांची यादी जाहीर

## विवेक कोल्हे, प्रज्ञा सातव यांचेही नाव




मुंबई: राज्याचं लक्ष लागलेल्या विधानपरिषद (BJP Vidhanparishad) निवडणुकांच्या उमेदवारांपैकी पहिल्यांदा भाजपकडून (BJP) 6 नावांची घोषणा झाली आहे. भाजपच्या संसदीय कमिटीच्या मान्यतेनंतर भाजपने अधिकृतपणे महाराष्ट्रातील 5 विधानपरिषदांच्या जागेसाठी पाच नावांची घोषणा केली. तर, विधानपरिषदेच्या एका पोटनिवडणुकीसाठी एक म्हणजेच एकूण 6 उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये, काँग्रेसमधून भाजपात आलेल्या प्रज्ञा सातव यांना पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. तर,अहिल्यानगरमधील विवेक कोल्हेंना संधी विधानपरिषदेची संधी मिळाली आहे. सुनिल कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. विवेक कोल्हे यांचं नाव निश्चित झाल्याच्या कालपासून चर्चा सुरु होत्या. विवेक कोल्हे यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती. प्रमोद जठार हे सिंधुदुर्गमधील भाजप नेते असून त्यांना भाजपकडून संधी देण्यात आली आहे.

भाजपने जाहीर केलेल्या 5 नावांमध्ये माधवी नाईक यांचंही नाव असून ते अनेक वर्षांपासून भाजप संघटनेत काम करतात. तर, पान 3 वर

# आज ठळक

## मंत्री झालो तर एकटा दहा मंत्र्यांचं काम करेल-रवी राणा



गेल्या काही काळात राज्यातील राजकारणात मोठा बदल घडलेला आहे. 2024 च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने दणदणीत विजय मिळवत विरोधकांचा सुपडा साफ केला होता. या विजयामुळे महायुतीचे 235 आमदार विधानसभेत पोहोचले होते. त्यामुळे मंत्रिपदासाठी अनेकांमध्ये चुरस पहायला मिळाली. आमदारांची संख्या जास्त असल्यामुळे काही वरिष्ठ नेत्यांनाही मंत्रिपदापासून दूर रहावे लागले होते. यात अमरावतीच्या बडनेराचे भाजप पुरस्कृत आमदार रवी राणा यांचाही समावेश आहे. अशातच आता रवी राणा यांनी मंत्रिपदाची इच्छा बोलून दाखवली आहे. रवी राणा यांनी नेमकं काय म्हटलं ते सविस्तर जाणून घेऊयात.अमरावतीतील एका कार्यक्रमात बोलताना रवी राणा यांनी म्हटले की, ‘अनेक पदे येतात, पदे जातात. कधी पान 3 वर

## अजित दादांच्या निधनादिवशी व्ही के सिंगला बक्षीस दिले – रोहित पवार



अजित पवार यांच्या निधनाला 3 महिने पूर्ण झाले आहेत. या अपघात प्रकरणाचा तपास सध्या सुरु आहे. अशातच आज रोहित पवार यांनी अजित पवार पवार यांच्या विमान अपघातावर खळबळजनक विधान केले आहे. रोहित पवार यांनी म्हटले की, आज अपघाताला तीन महिने पूर्ण होत आहेत. आमच्या कडे जे पुरावे आले आहेत ते देणार आहोत. काय वस्तुस्थिती आहे त्याची माहिती देण्यासाठी आज आम्ही आलो आहोत. कर्नाटकमध्ये जो FIR दाखल केला, तो आता CID कडे पाठवला आहे अशी माहिती दिली आहे.

रोहित पवार यांनी आज या अपघाताबाबत खळबळजनक दावा केला आहे. अजित पवार ज्या विमानाने प्रवास करत होते ते विमान VSR कंपनीचे आहे, ज्याचे मालक व्ही के सिंग आहेत. याबाबत बोलताना रोहित पवार यांनी म्हटले की, ‘अजित दादांचा अपघात सकाळी झाला तेव्हा व्ही के सिंगला बक्षीस म्हणून 9 कोटी 81 लाख रुपये दिले, तर दुसऱ्या दिवशी म्हणजे अजित दादांचा अंत्यविधी सुरु होता तेव्हा 16 कोटी 88 लाख रुपये दिले. आतापर्यंत 145 कोटी सिंग ला दिले आहेत.’पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले की, खरातचा अँगल आम्ही हाती घेतला नव्हता, तो ही हाती घ्यायचा आहे. अजित दादांच घर काटेवाडीला आहे. बारामतीचा छोटा नेता आहे तो खरातच्या संपर्कात होता. त्या छोट्या नेत्याचे आर्थिक संबंध आहेत. काटेवाडीच्या घरा बाहेर पूजा छोट्या पान 3 वर

# बीडमध्ये अपघात; खासदारांच्या कारला धडक



बीडमध्ये एक अपघाताची घटना घडली असून खासदार बजरंग सोनवणे यांच्या कारला दुचाकीची धडक बसल्याची माहिती समोर आली आहे. ही घटना ते बीडहून केजकडे जात असताना मस्साजोग बसस्थानकाजवळ घडली. मिळालेल्या माहितीनुसार, खासदारांचा ताफा काही वेळासाठी थांबला असताना अचानक दुचाकीने त्यांच्या कारला जोरात धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला असून त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# खरीप हंगामात खतांचे लिंकिंग रोखण्यासाठी राज्यात ‘उत्तर प्रदेश पॅटर्न’

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची मोठी घोषणा, ‘माफदा’चा बंद मागे




मुंबई : खरीप हंगामात कोणत्याही खताचे अन्य खते, औषधांसोबत लिंकिंग (जोडणी) होणार नाही. त्यासाठी राज्यात उत्तर प्रदेश पॅटर्नची अंमलबजावणी केली जाईल, अशी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दीर्घकालीन हिताची घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केली. कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या अन्य मागण्यांबाबतही सकारात्मक निर्णय झाल्यामुळे माफदा संघटनेने बंद मागे घेतल्याचे जाहीर केले.

महाराष्ट्र फर्टीलायझर पेस्टीसाईडस् सीडस् डिलर्स असोशिएशनने (माफदा) आपल्या विविध मागण्यांसाठी सोमवार, 27 एप्रिलपासून बेमुदत बंद पुकारला होता. कृषी विभागाने तातडीने दखल घेऊन मंगळवारी मंत्रालयात बैठकीचे आयोजन केले होते. कृषिमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला अधिकारी, माफदाचे पान 3 वर

# वडिलांचा मृत्यू झाला त्या VSR च्या विमानात पार्थ पवार बसले तरी कसे? दमानियांचा सवाल

## सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रवासावरही आक्षेप



अजित पवार यांच्या विमान अपघातावरुन विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आमदार रोहित पवारांनी या अपघातावरुन व्हिएसआर कंपनीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. व्हिएसआर कंपनीच्या मालकाविरोधात रोहित पवार सातत्याने शंका उपस्थित करत आहेत. अशात पार्थ पवारांनी याच कंपनीच्या विमानातून प्रवास केल्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच, सरकारी अधिकाऱ्यांची खासगी कामासाठी उपस्थिती आणि चार्टर प्रवासावर त्यांनी आक्षेप घेतला. अंजली दमानिया यांनी एक्सवर एक पोस्ट करुन पार्थ पवार यांच्या व्हिएसआर कंपनीच्या विमानातून केलेल्या प्रवासावर पान 3 वर

## 29 एप्रिलनंतर देशात पेट्रोल-डिझेल महाग होण्याची शक्यता”; राहुल गांधींचा मोठा दावा



“देशात 29 एप्रिलनंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ होऊ शकते”, असा दावा काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. “निवडणुकीच्या काळात केंद्र सरकारने भाव स्थिर ठेवत असले तरी, मतदान प्रक्रिया पूर्ण होताच सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे,” असे राहुल गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. पण, केंद्र सरकारने राहुल गांधींचे हे दावे फेटाळून लावले आहेत. सध्या विविध राज्यात सुरु असलेल्या निवडणुका संपल्यानंतर, विशेषतः 29 एप्रिलनंतर देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ होऊ शकते, असा दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. तेल पान 3 वर

# आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांसाठी सर्वसमावेशक बदली धोरण



मुंबई: सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाने राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील गट ब, क आणि ड कर्मचाऱ्यांसाठी सर्वसमावेशक बदली धोरण लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला.

राज्य शासनाने 15 एप्रिल रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागांतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये सुसूत्रता, पारदर्शकता आणि कार्यक्षमतेस प्राधान्य देण्यात आले आहे. यापूर्वी अस्तित्वात असलेले पान 3 वर

# शिवद्रोहींवर कारवाईची मागणी; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन




बीड : छत्रपती शिवाजी महाराजांविषयी तथ्यहीन व ऐतिहासिक आधार नसलेली विधाने करून अवमानना करणार्या बागेश्वरधामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्यावर कठोर कारवाई करावी, या प्रमुख मागणीसाठी शिवप्रेमी डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेश) यांच्या नेतृत्वाखाली आज (दि.27) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.

फडणवीस सरकारच्या कार्यकाळात बहुजन महापुरुषांची अवमानना करणार्या वाचाळवीरांच्या संख्येत वाढ झाल्याचा आरोप करत, सरकारकडून ठोस कारवाई होत नसल्याचे पान 3 वर

# ग्रामीण रुग्णालयातील अत्याधुनिक विनामूल्य उपचाराबाबत जनजागृती करा-आ.सुरेश धस



आष्टी : आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलिसिस सारखे दुर्धर आजारावरील अत्याधुनिक उपचार तसेच अनेक आजारांवर उपचार सुरु करण्यात आले असून शहरी भागातील खर्चिक उपचारांपेक्षा आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये विनामूल्य असलेल्या या उपचाराचा फायदा गोरगरीब रुग्णांनी घ्यावा याबाबत ग्रामीण भागामध्ये कार्यकर्त्यांनी जनजागृती करावी आणि आरोग्य सेवेचा सर्वात मोठा खर्च वाचवावा असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये डायलिसिस सेंटर सोनोग्राफी मशीन चा शुभारंभ प्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर बीड जिल्हा पान 3 वर

## बड्या मंत्र्याने घेतली जरांगे पाटलांची भेट, नेमकी काय झाली चर्चा?



मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी काही दिवसांपूर्वी पुन्हा रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला होता. जरांगे पाटलांनी म्हटले होते की, सरकारने शब्द दिला होता ती सर्व गुन्हे मागे घेतले जातील. जो पर्यंत सर्व गुन्हे मागे घेतले जाणार नाही तो पर्यंत मी शांत बसणार नाही. गुन्हे मागे घेतले नाही तर सर्वात मोठं आंदोलन उभं करून सर्व गुन्हे मागे घेण्यास भाग पाडू. तसेच मराठा समाजाला पान 3 वर

## भारताची जनगणना 2027 : डिजिटल युगातील पहिली जनगणना




भारताची 16 वी आणि स्वातंत्र्यानंतरची 8 वी जनगणना 2027 मध्ये होणार आहे. 2011 नंतर 16 वर्षांनी होणारी ही जनगणना अनेक कारणांमुळे ऐतिहासिक ठरणार आहे. कोविड-19 मुळे 2021 ची जनगणना पुढे ढकलण्यात आली होती.

- **जनगणनेची ठळक वैशिष्ट्ये:**
- **1. पहिली डिजिटल जनगणना**

ही भारताची पहिली पूर्णपणे डिजिटल जनगणना असेल. गणक कर्मचारी मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित करतील. नागरिकांसाठी _ स्वतः माहिती भरण्याची सुविधा_ प्रथमच उपलब्ध करून देण्यात आली आहे. http://census.gov.in पोर्टलवर नागरिक स्वतःच्या घराची माहिती भरू शकतात.

- **2. दोन टप्प्यांत जनगणना**

- *पहिला टप्पा : घरांची यादी आणि गृह जनगणना

एप्रिल ते सप्टेंबर 2026. यात घरांची स्थिती, उपलब्ध सुविधा, मालमत्ता यांची माहिती घेतली जाईल.

- **– *दुसरा टप्पा : लोकसंख्या गणना***

फेब्रुवारी 2027. यात वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय, स्थलांतर, जन्मदर यांसारखी वैयक्तिक माहिती नोंदवली जाईल.

- ***3. जात जनगणनेचा समावेश***

1931 नंतर प्रथमच जनगणनेत जातीची गणना केली जाणार आहे. आतापर्यंत फक्त अनुसूचित जाती आणि जमातींचीच गणना होत होती.

- ***4. तंत्रज्ञान आणि सुरक्षा***

₹11,718.24 कोटींचा खर्च. सुमारे 30 लाख गणक कर्मचारी. Census Management & Monitoring System द्वारे प्रत्यक्ष वेळेत देखरेख. माहितीच्या सुरक्षेसाठी Critical Information Infrastructure अंतर्गत विशेष डेटा सेंटर उभारले आहेत.

- ***ब्रीदवाक्य : "जनगणना से जन कल्याण"***

म्हणजेच जनगणनेतून जनकल्याण. अचूक आकडेवारीमुळे अन्न, पाणी, वीज, रस्ते, आरोग्य, शिक्षण यांसारख्या क्षेत्रांचे नियोजन करता येते. सरकारी योजना योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यास मदत होते.

- ***महाराष्ट्रातील स्थिती***

महाराष्ट्रातही गणक आणि पर्यवेक्षकांची नियुक्ती सुरु झाली आहे. लवकरच प्रशिक्षण दिले जाईल. बीडसह सर्व जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबवला जाईल.

ही जनगणना भारताच्या सामाजिक आणि आर्थिक नियोजनाचा पाया ठरेल. प्रत्येक नागरिकाने यात सहभाग घेऊन अचूक माहिती द्यावी, असे आवाहन सरकारने केले आहे.

# जागतिक भारतीय प्रवासी समुदाय, आंतरराष्ट्रीय संबंधवाद आणि शाश्वत विकास : एक विश्लेषण

**डॉ. भारत कऱ्हाड**



जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भारतीय प्रवासी समुदाय हा केवळ स्थलांतरित लोकांचा समूह राहिलेला नाही, तर तो भारताच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजनैतिक सामर्थ्याचा एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ बनला आहे. भारताबाहेर वास्तव्यास असलेले भारतीय नागरिक किंवा भारतीय वंशाचे लोक यांना एकत्रितपणे "भारतीय प्रवासी समुदाय" असे संबोधले जाते. आज हा समुदाय जगातील सर्वात मोठ्या आणि प्रभावी प्रवासी समुदायांपैकी एक आहे. अमेरिका, युनायटेड किंगडम, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, मध्यपूर्व आणि आफ्रिकेतील अनेक देशांमध्ये भारतीयांनी आपली ठोस ओळख निर्माण केली आहे.

या संदर्भात "आंतरराष्ट्रीय संबंधवाद" ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. आंतरराष्ट्रीय संबंधवाद म्हणजे एखाद्या व्यक्तीने किंवा समुदायाने एकाच वेळी दोन किंवा अधिक देशांशी सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध टिकवून ठेवणे. भारतीय प्रवासी समुदाय हे या संकल्पनेचे जिवंत उदाहरण आहे. परदेशात स्थायिक झाल्यानंतरही अनेक भारतीय आपल्या मातृभूमीशी भावनिक, आर्थिक आणि सांस्कृतिक नाते जपतात. ते भारतात गुंतवणूक करतात, कुटुंबीयांना आर्थिक मदत करतात आणि परंपरा-संस्कृतीचा वारसा जपतात. त्यामुळे ते दोन देशांमध्ये एक मजबूत दुवा निर्माण करतात.

भारतीय प्रवासी समुदायाचे सर्वात ठोस आर्थिक योगदान म्हणजे "परदेशी धनप्रेषण" होय. परदेशात कार्यरत असलेल्या भारतीयांनी आपल्या देशात पाठवलेली रक्कम म्हणजे परदेशी धनप्रेषण. भारत हा जगातील सर्वाधिक धनप्रेषण प्राप्त करणारा देश म्हणून ओळखला जातो. या आर्थिक प्रवाहामुळे ग्रामीण भागातील विकास, शिक्षण, आरोग्य सेवा आणि लघुउद्योगांना मोठी चालना मिळते. यामुळे शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांना अप्रत्यक्ष पण प्रभावी बळ मिळते.

"शाश्वत विकास" ही संकल्पना आजच्या काळात अत्यंत महत्त्वाची ठरते. वर्तमानाच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम होणार नाही, अशा पद्धतीने विकास साधणे म्हणजे शाश्वत विकास. यामध्ये आर्थिक प्रगतीसोबतच सामाजिक समता आणि पर्यावरणीय संतुलन यांचा समन्वय आवश्यक असतो. या दृष्टीने भारतीय प्रवासी समुदायाचे योगदान बहुआयामी स्वरूपाचे आहे. परदेशातील प्रगत तंत्रज्ञान, संशोधन आणि कौशल्य भारतात आणणे, नवउद्योगांमध्ये गुंतवणूक करणे, कौशल्य विकास कार्यक्रमांना चालना देणे आणि सामाजिक संस्थांना मदत करणे ही त्याची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

भारतीय प्रवासी समुदायामुळे भारताला विविध आर्थिक फायदेही होतात. परकीय चलनाची आवक वाढते, गुंतवणूक वाढते, रोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि उद्योग-व्यवसायाचा विस्तार होतो. यामुळे देशाच्या आर्थिक स्थैर्याला बळकटी मिळते. त्याचबरोबर, आंतरराष्ट्रीय संपर्क जाळ्यांच्या माध्यमातून जागतिक स्तरावर ज्ञान आणि संसाधनांची देवाणघेवाण सुलभ होते. भारतीय शास्त्रज्ञ, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक आणि उद्योजक यांनी जागतिक अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

तथापि, या प्रक्रियेसमोर काही आव्हानेही उभी राहतात. "मेंदू पलायन" म्हणजे उच्च शिक्षित आणि कुशल मनुष्यबळाचे परदेशात स्थलांतर हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. यामुळे देशातील प्रतिभेची कमतरता निर्माण होण्याची शक्यता असते. मात्र, सध्याच्या काळात "मेंदू परिभ्रमण" ही संकल्पनाही वेगाने पुढे येत आहे. अनेक भारतीय परदेशात अनुभव मिळवल्यानंतर पुन्हा भारतात परत येऊन देशाच्या विकासात सक्रिय योगदान देत आहेत. त्यामुळे ही प्रक्रिया आता एकतर्फी राहिलेली नाही.

सांस्कृतिक दृष्टिकोनातून पाहिले तर भारतीय प्रवासी समुदाय हा भारताच्या "मृदू शक्ती"चा एक प्रभावी घटक आहे. योग, आयुर्वेद, भारतीय खाद्यसंस्कृती, सण-उत्सव आणि पारंपरिक मूल्ये यांचा जागतिक प्रसार करण्यात या समुदायाची मोठी भूमिका आहे. त्यामुळे भारताची सकारात्मक प्रतिमा जागतिक पातळीवर अधिक बळकट होते.

या पार्श्वभूमीवर भारत सरकारने प्रवासी भारतीयांसाठी अधिक प्रभावी आणि सुसंगत धोरणे राबवणे आवश्यक आहे. प्रवासी भारतीयांना केवळ आर्थिक गुंतवणूकदार म्हणून नव्हे, तर विकास भागीदार म्हणून पाहणे गरजेचे आहे. "मेक इन इंडिया", "स्टार्टअप इंडिया" आणि "डिजिटल इंडिया" यांसारख्या उपक्रमांमध्ये त्यांचा अधिक सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे.

एकंदरीत पाहता, भारतीय प्रवासी समुदाय हा भारताच्या विकास प्रक्रियेतील एक गतिशील आणि शक्तिशाली घटक आहे. आंतरराष्ट्रीय संबंधवादामुळे जागतिक स्तरावर भारताचे स्थान अधिक दृढ होत आहे, तर शाश्वत विकासाच्या दिशेने नवीन संधी उपलब्ध होत आहेत. योग्य धोरणात्मक नियोजन, समन्वय आणि दूरदृष्टी यांच्या साहाय्याने या समुदायाचा अधिक प्रभावी उपयोग करता आला, तर भारत निश्चितच एक सक्षम, समृद्ध आणि शाश्वत राष्ट्र म्हणून उदयास येईल.

21व्या शतकातील भारतासाठी प्रवासी समुदाय ही केवळ लोकसंख्या नसून 'विकासाची जागतिक शक्ती' आहे.

अभ्यासकांसाठी नवीन मराठी शब्दांचे अर्थ प्रश्न–उत्तरे स्वरूपात पुढे दिले आहेत:

प्र.1) आंतरराष्ट्रीय संबंधवाद म्हणजे काय?

उ. एकाच वेळी दोन किंवा अधिक देशांशी सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध टिकवून ठेवण्याची प्रक्रिया म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंधवाद.

प्र.2) परदेशी धनप्रेषण म्हणजे काय?

उ. परदेशात राहणाऱ्या व्यक्तींनी आपल्या देशात पाठवलेली रक्कम म्हणजे परदेशी धनप्रेषण.

प्र.3) शाश्वत विकास म्हणजे काय?

उ. वर्तमानाच्या गरजा पूर्ण करताना भविष्यातील पिढ्यांच्या गरजांवर परिणाम न होऊ देता साधलेला संतुलित विकास म्हणजे शाश्वत विकास.

प्र.4) नवउद्योग म्हणजे काय?

उ. नवीन कल्पना, तंत्रज्ञान किंवा संकल्पनेवर आधारित सुरु केलेला व्यवसाय म्हणजे नवउद्योग.

प्र.5) आंतरराष्ट्रीय संपर्क जाळे म्हणजे काय?

उ. विविध देशांतील व्यक्ती, संस्था आणि व्यवसाय यांच्यातील संबंधांचे जाळे म्हणजे आंतरराष्ट्रीय संपर्क जाळे.

प्र.6) मेंदू पलायन म्हणजे काय?

उ. उच्च शिक्षित आणि कुशल लोकांचे परदेशात स्थायिक होणे म्हणजे मेंदू पलायन.

प्र.7) मेंदू परिभ्रमण म्हणजे काय?

उ. परदेशात अनुभव मिळवल्यानंतर पुन्हा आपल्या देशात परत येऊन काम करणे म्हणजे मेंदू परिभ्रमण.

प्र.8) मृदू शक्ती म्हणजे काय?

उ. एखाद्या देशाची संस्कृती, मूल्ये आणि परंपरा यांद्वारे इतरांवर प्रभाव टाकण्याची क्षमता म्हणजे मृदू शक्ती.

प्र.9) प्रवासी समुदाय म्हणजे काय?

उ. आपल्या मूळ देशाबाहेर राहणाऱ्या लोकांचा समूह म्हणजे प्रवासी समुदाय.

प्र.10) जागतिकीकरण म्हणजे काय?

उ. जगातील विविध देशांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संबंध वाढण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# प्रबोधनाचा लोकस्वर: स्मृतिशेष आबाजीराव तायडे (अण्णा)




महात्मा बुद्ध-शिवराय -फुले -शाहू - डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचे क्रांतीदर्शी विचार व आंबेडकरी समाजप्रबोधनात्मक जाणिवांचे आशयसूत्र जनमानसात पोचवणारे लोकगायक तथा सेवानिवृत्त तंत्रज्ञ आमचे वडील स्मृतिशेष आबाजीराव तायडे (अण्णा) यांचा 29 एप्रिल स्मृती दिन. त्या निमित्ताने या समृद्ध पर्वाचा अर्थातच अण्णांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक कार्याचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न....

आपल्या देशात सामाजिक आणि सांस्कृतिक प्रबोधन करणाऱ्या मंडळींची मोठी परंपरा आहे. आपल्या परिवर्तनीय गायकीतून समाजमनाला जागृत करण्यासाठी 1965 साली "समाज सुधारक गायन मंडळ" स्थापन झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आंगलगाव ता. जि. परभणी येथे लोकगायक स्मृतिशेष आबाजी मेसाजी तायडे, यादव कांबळे, ज्ञानोबा कांबळे, देविदास नाटकर, लिंबाजी मस्के, वामन कांबळे, हरिभाऊ कांबळे, रंगनाथ कांबळे, गंगाराम साबणे, शेषेराव साबणे, मूंजाजी कांबळे, पिराजी कांबळे, त्र्यंबक तायडे, लक्ष्मण तायडे, अशोक कांबळे, साहेबराव तायडे, या सर्व समविचारी उपासकांच्या साथीने "समाज सुधारक गायन मंडळाची उभारणी केली.

समाजाचे अंतरंग उजळण्यासाठी या सर्व भीमसैनिकांनी सांस्कृतिक चळवळ सुरु केली. महाराष्ट्रभर बुद्ध-भीम गीतांचे जोशपूर्ण सादरीकरण केले. उपजत कलात्मक ज्ञानाचा कसलाही अभिनिवेश न बाळगता समाजातील अशिक्षित, अल्पशिक्षित, श्रमिक, कष्टकरी लोकांचं प्रबोधन केलं. या गायन मंडळात प्रमुख गायक म्हणून कालकथीत आबाजीराव तायडे, यादव कांबळे तसेच हरिभाऊ कांबळे, त्र्यंबक तायडे हे उत्कृष्ठ ढोलकीपटू पंचक्रोशीत प्रसिद्ध झाले. यादव कांबळे, मुंजाजी कांबळे हार्मोनियम, देविदास नाटकर झांज, लिंबाजी मस्के कडीवादन करायचे तर गंगाराम साबणे, शेषराव साबणे साथ-संगत करायचे.

ज्या कुटुंबात शिक्षणाचा गंध नाही, अशा कुटुंबात आबाजी तायडे (अण्णा) यांचा जन्म 03 ऑगस्ट 1950 रोजी परभणी जिल्ह्यातील आंगलगाव येथे झाला. (मूळगाव बोंदरगाव). ज्या कालखंडात त्यांचा जन्म झाला, तो काळ सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक आणि स्वातंत्र्योत्तर चळवळीने भारलेला होता. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक चळवळीने संपूर्ण महाराष्ट्र जागा झालेला होता. अशा काळात आबाजी तायडे (अण्णा) यांचे बालपण गेले. त्यांचे शालेय शिक्षण प्रतिकूल परिस्थितीत झाले. परिस्थितीशी दोन हात करत, मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण घेतले. 70 वर्षांच्या समग्र जीवनप्रवासात त्यांची पत्नी आमची आई सत्यभामा आबाजी तायडे यांनी, मोठया धैर्याने त्यांना साथ दिली. अण्णांच्या वैयक्तिक, सार्वजनिक जीवनात आईंनी सर्वांना एकोप्याने सांभाळले. आई-अण्णांनी कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या पेलत घराला आधार दिला. आम्हां बहीण-भावंडांना वाढविले. शिक्षण देऊन सन्मानाचे जीवन दिले.

बहीण सुनिता भगवान जगताप कुटुंब संगोपन आणि धम्म कार्यात सहभागी असतात. बंधु विष्णू तायडे विद्युत विभागात ऑपरेटर म्हणून सेवा बजावत आहेत. धाकटे बंधु राहुल तायडे विद्युत विभागात सक्रियपणे कार्यरत आहेत. आई-अण्णांच्या संस्काराने मी शैक्षणिक-सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात प्रामाणिकपणे उभा आहे. आज आम्ही जे काही आहोत ते केवळ विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि आई-अण्णां मुळेच. स्वाती, अजय, शुभम, वैभव, मधुरा, सुबोध, सम्यक, रसिका, किया, सक्षम ही नातवंडे म्हणजे दुधावरील सायीप्रमाणेच! नातवंडे अंगा-खांद्यावर खेळविणारे, सुना लेकीप्रमाणे सांभाळणारे कुटुंबवत्सल अण्णा सदोदित आमच्या हृदयात राहतील. आमचे बंधू मार्गदर्शक-साहित्यिक प्रोफेसर डॉ. संजय जाधव यांच्या विषयी ते अभिमानाने बोलत. आमच्या मित्रांवर निरपेक्ष प्रेम करणारे अण्णा! बालासाहेब इंगळे, भीमयुगकार रानबा गायकवाड, डॉ. रमेश इंगोले, राजू डापकर, शंकर सिनगारे, बबन मस्के, अनिलकुमार साळवे, लहू कांबळे, संतोष पोटभरे, तानाजी चौरे, विनोद लांडगे, बा. सो. कांबळे, प्रदिप भोकरे, अरुण सरवदे, चंद्रकांत जोगदंड, विकास वाघमारे, स्वप्नील सिध्दांती, मदन ईदगे, मिलिंद मस्के आदि असंख्य स्नेही-सन्मित्रांना अण्णांनी जीव लावला.

अस्तित्वाच्या जाणीवेच्या ठिणगीचे एका झगझगीत प्रकाशात रुपांतर करुन वंचीत घटकांमध्ये लढण्याची जिद्द व समता निर्माण करणे आंबेडकरी चळवळीचा मुख्य उद्देश राहिला आहे. या चळवळीतील कार्यकर्त्यांनी, लोककवी-गायकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार व मुल्यातून प्रेरणा घेऊनच कार्य केले आहे. याच प्रेरणेतून स्मृतिशेष आबाजीराव तायडे व सहकारी यांनी समाज सुधारक गायन मंडळाच्या माध्यमातून सांस्कृतिक चळवळ उभी केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तेजाचे एक वलय निर्माण केले. ज्याच्या किरणांनी अनेक कवी-गायक-जलसेकार, लेखक, समीक्षक व विचारवंत विविध वैचारिक क्षेत्रांमध्ये निर्माण झाले. काहींनी इतिहासातील दलितांचे शौर्य, कर्तबगारी बौद्धिक संपत्ती यावर संशोधन सुरु केले तर लोककवी वामनदादा कर्डक सारख्या भीमशाहिरांनी आंबेडकरी विचार जनमानसात रुजविण्यासाठी प्रयत्न केले. यात आमचे वडील स्मृतिशेष आबाजीराव तायडे व सहकारी यांच्या समाज सुधारक गायन मंडळाचेही भरीव योगदान आहे.

आत्मसन्मान आणि सत्तासंघर्ष याची सुरवात संगीत आणि गाण्यांमधून होणाऱ्या सांस्कृतिक रुढींचा विरोध आणि उठाव यातून होताना दिसून येते. गाण्यांमधून व संगीतामधून निर्माण होणाऱ्या आठवणी आणि त्यात असणाऱ्या भावनांना जागृत करण्याची क्षमता ही दलित लढा सातत्याने सुरु ठेवण्यासाठीचे शक्तीस्रोत ठरले आहे. आंबेडकरी जलसा हे त्याचे ठळक उदाहरण आहे. आंबेडकरी दलित रंगभूमी ही देखील दलित समजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक पुनर्रचनेसाठी उत्प्रेरक ठरली आहे. याची सुरवात आंबेडकरी संमेलनातून होऊन टप्प्याटप्प्याने लोकनाट्य, पथनाट्य यातून प्रगत झाले. लोकशाहीर वामनदादा कर्डक या प्रख्यात शाहीरांनी लिहिले आहे,

> "तुफानातले दिवे आम्ही, तुफानातले दिवे"

ही सर्व गाणी साधी पण शक्तिशाली होती. तरीही, यापैकी बहुतेक लोककलावंत लोकप्रियता प्राप्त नाहीत कारण प्रसिद्धी मिळविणे हा त्यांचा उद्देशच नसतो. तथापि, जनतेवर आणि महाराष्ट्रात विवेकबुद्धी निर्माण करण्याचा त्यांचा प्रभाव अफाट आहे. त्यांच्या गाण्यांसह, शाहीर लोकांपर्यंत पोहोचले. शाहीर भीमराव कर्डक यांचा जलसा पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर एकदा म्हणाले, "माझ्या दहा सभा व मेळावे आणि कर्डक यांचा एक जलसा समान आहे." बहुजन समाजातील कलाकारांनी बहुजनांच्या प्रबोधनासाठी सादर केलेली कलाकृती म्हणजे जलसा असं त्याचं स्वरुप होतं. समाजातील परिस्थितीचं वर्णन करून लोकशिक्षण, मनोरंजन असं त्याचं स्वरुप होतं. सावकार, ब्राह्मण यांच्या दडपणाखाली हलाखीचं जीवन जगणाऱ्या बहुजन समाजाला जागं करणं, विचार करायला लावणं हे त्याचं उद्दिष्ट होतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सांस्कृतिक लढाईस लोककवी-गायकांनी लेखन-गायनाने बळकटी दिली आहे.

प्रसिद्धी पासून कायमच अलिप्त राहून, झगमगाटाला न भुलता साधेपणाने व प्रामाणिकपणे आयु. आबाजीराव तायडे यांनी 1965 ते 1980 या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी कार्यातून व लोककवी वामनदादा कर्डकांचा आदर्श समोर ठेवून बुद्ध-भीम गीतातून प्रबोधन कार्य केले. गिरवली सबस्टेशन बुध्द विहार समिती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव, पंचशील बुद्ध विहार आणि सम्राट अशोक विचार मंच, परळी वैजनाथ जिल्हा बीड यांच्या माध्यमातून त्यांनी धम्मकार्य केले. 1980 ते 2010 दरम्यान त्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात तंत्रज्ञ म्हणून सेवा केली. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या नाट्य स्पर्धेत सहभागी होत नेपथ्य व प्रकाश आयोजनात सक्रिय असत. त्यांच्या रंगभूमीवरील संचारामुळेच मलाही प्रेरणा व प्रोत्साहन मिळाले. ज्येष्ठ साहित्यिक-संपादक भीमयुगकार रानबा गायकवाड लिखित आणि प्रा.डॉ. सिद्धार्थ तायडे दिग्दर्शित 'भीमयुग' या नाट्य निर्मितीत त्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. "गुणवंत तंत्रज्ञ" म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वतीने त्यांचा सेवा गौरवही करण्यात आला.

मला अण्णा मधील अनेक गोष्टी आवडतात, माणसाचं वैभव त्यांनी गोळा केलं. रक्तापलीकडील कितीतरी नाती त्यांनी तयार केली. ती नाती जोपासली. आमच्या आई-अण्णांचं जे माणसं लाभण्याचं भाग्य आहे ते आपसूकच माझ्या वाट्याला आलं आहे. प्रिय अण्णा, तुमच्या त्यागाला, परिश्रमाला आम्ही शब्दांत मांडूच शकत नाहीत. तुमच असणं आमच्यासाठी सर्वकाही होतं... ते आमच्या आयुष्यातील एक सुंदर पर्व होतं... आज सर्व काही असण्याची जाणीव आहे... पण तुम्ही नसणे ही मोठी उणीव आहे...

आपुलकी व माणुसकी या गोष्टींची ज्यावेळी चर्चा होईल, त्यावेळी सर्वात अगोदर अण्णा, तुमची आठवण येईल. व्यक्ती जन्म घेतो त्या व्यक्तीचे हे जग सोडून जाणे अटळ आहे. म्हणजेच ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू सुद्धा आहे पण अलीकडे आपण एका माणुसकी हरवलेल्या जगामध्ये जगत आहोत. प्रत्येकाला एक दिवस मरणाला सामोरे जावे लागणार आहे. हा निसर्गाचा नियमच आहे. तो कोणाला चुकलेला नाही. परंतु जीवन जगत असताना आपल्या हातून कोणाचेही मन दुखावले जाऊ नये, याची आपण काळजी घेतली पाहिजे. आपल्या सहवासात असणारा प्रत्येक व्यक्ती एक दिवस आपल्या पासून दूर निघून जाणार आहे. ही भावना मनात ठेवून आपण त्यांच्याशी आपुलकीने वागले पाहिजे. हीच शिकवण आपण आम्हाला देऊन गेलात. वडील आणि सूर्य यात एक साम्य आहे दोघांच्या नसण्याने आपल्या आयुष्यात अंधार होतो. तुमच्या निधनाने हातात हात घेऊन चालणारी प्रेरणा हरपली! तुमचे संस्कार आणि विचार घेऊनच जीवन पथावर चालत राहू..

> "अंधाऱ्या रात्रीतुन सूर्य उगवण्याची बात करू,
> संकटांशी मित्रा धीराने दोन हात करू...
> काल सुख आज दुःख दोघांना आबाद करू..
> वादळे-तुफान येतील, छाती पोलाद करू...
> पराजयाची भीती नको, शत्रुवर प्रहार करू,
> सारे एकजुटीने पुन्हा, नवा एल्गार करु
> आपुलकीने माणूसकीचा, नवा गाव उभारू...."

अशीच प्रेरणा देऊन गेलात. प्रिय अण्णा, आयुष्यातील येणाऱ्या सर्व आव्हानांना कसे सामोरे जावे हे तुम्हीच आम्हाला शिकवले... दिवसरात्र कष्ट करून, स्वतःच्या आनंदाचा त्याग करून आम्हाला आनंदी जीवन दिले. ज्यांच्यामुळे आमची ओळख आहे ते म्हणजे आमचे आदरणीय 'अण्णा'...! तुम्ही आमच्या चांगल्या आणि वाईट काळात नेहमी आमच्या सोबत होतात नेहमी असेच आमच्या पाठीशी रहा.

श्रद्धेय अण्णा, तुम्ही अपार कष्ट सोसले, स्वसुख भोगायचे राहून गेले, रंजल्या-गांजलेल्याना जीव लावला, सर्वांच्या कल्याणासाठी देह झिजविला! क्षणो क्षणी आता तुमचीच आठवण येते... जीवलग लोकांच्या दूर जाण्याने डोक्यावरच छप्पर नाहीसं होतं आणि पायाखालची जमीन सरकते. दुःखाचा डोंगर कोसळतो. जीवन जितकं सुंदर आहे तितकच ते दुःखद सुद्धा आहे. आपल्या आयुष्यात येणाऱ्या दुःखाला आपण धैर्याने सामोरं गेलं पाहिजे, कारण दुःख ही सुखाची दुसरी बाजू आहे.

खरंच जीवन जितकं सुंदर आहे तितकच ते वाईट पण आहे. असं वाटतं आपल्या प्रिय लोकांनी आपल्याला कधीच दूर सोडून जाऊ नये, पण निसर्गाच्या पुढे कुणाचे काही चालत नाही. कारण ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू पण आहे. हे चार दिवसांचं आयुष्य आपण खूप आनंदाने जगलं पाहिजे. आपल्या आयुष्यात आपण इतरांचा तिरस्कार कधीच केला नाही पाहिजे. इतरांचं मन अजिबात दुखावलं नाही पाहिजे. आपल्या व इतरांच्या आयुष्यावर प्रेम केलं पाहिजे, खऱ्या अर्थाने चांगला माणूस म्हणून जगलं पाहिजे. हीच शिकवण अण्णा तुम्ही आम्हाला दिली. 29 एप्रिल 2021 रोजी अण्णांनी जगाचा निरोप घेतला.

आयुष्यभर तुमच्या सहवासाची उणीव मात्र भासत राहील. तुम्ही आम्हाला एवढं प्रेम दिलं की ते प्रेम, प्रेम करणाराचा समजू शकतो. तुमचं प्रेम आणि तुमचे आशिर्वाद सदैव आमच्यासोबत असतील.

"आज स्मृतींच्या पानांवर उमलून आले नाव प्रिय अण्णांचे,
भीमशाहीरांचे ते स्वर,
गुंजले दशदिशांचे...
महापारेषणच्या सेवेत रमले,
गुणवंत ते तंत्रज्ञ,
सामाजिक, सांस्कृतिक, धम्मकार्यात सक्रिय सहभाग, निष्ठावंत...
अण्णा, तुम्ही होता दीपस्तंभ, प्रेरणादायी जीवनगाथा,
गोरगरिबांच्या मदतीला धावले, जोडली स्नेहाची मंगलगाथा.....
तुमच्या वाणीत होता सत्य आणि न्यायाचा हुंकार,
धम्माच्या मार्गावर चालताना, दाखविला सदाचार.....
पाचवे पुण्यस्मरण तुमचे, अन् डोळ्यांत दाटले पाणी,
तुमच्या आठवणींचा सुगंध, दरवळतो अजूनही जीवनी....
तुमचे विचार, तुमची शिकवण, जपून ठेवू आम्ही मनी,
तुमची स्मृती चिरंतन राहील, या जगात अमुच्या ध्यानी....
आदर्शांचे तुमचे जीवन, आम्हांस सदैव प्रेरणा देईल,
तुमच्या पावलांवर पाऊल ठेवत, समाजसेवा अविरत चालेल तुमच्या
पवित्र स्मृतीस,अर्पितो भावपूर्ण आदरांजली! 

**प्रा.डॉ.सिद्धार्थ सत्यभामा आबाजी तायडे**
**पंचशील नगर, परळी वै.**

**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

## पान 1 वरुन

गेल्या काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात तापमानात सातत्याने वाढ होत असून दुपारच्या सुमारास तापमान 40 ते 41 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे. औराद शहाजानी भागात हवामान केंद्रावर 43 अंश सेल्सिअस पर्यंत तापमानाची नोंद झाली आहे. तीव्र उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी वर्ग यांना विशेष धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, प्रशासन आणि आरोग्य विभागाकडून नागरिकांना अत्यावश्यक कामांशिवाय दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडू नये, पुरेसे पाणी प्यावे, हलके व सैल कपडे परिधान करावेत आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. विदर्भात राज्यातील सर्वाधिक तापमानाची नोंद झाली असून अकोल्यात तापमान 47 अंश सेल्सियसपर्यंत पोहोचल्याची नोंद आहे. अमरावतीमध्ये 45.2 तर वर्ध्यात 45.0 अंश तापमानाची नोंद झाली आहे.

--------------------------------

संजय भेंडे भाजपचे उपाध्यक्ष असून ते नागपूर भाजपचे जिल्हाध्यक्ष राहिले आहेत. तसेच, प्रमोद जठार यांनाही भाजपने संधी दिली असून जठार हे कोकणातील भाजपचे महत्त्वाचे नेते आहेत. कोकणावर अन्याय होत असल्याची भावना भरुन काढण्याचा प्रयत्न भाजपकडून या उमेदवारीच्या माध्यमातून करण्यात आला आहेकोल्हे परिवाराचे नगर जिल्ह्यात वर्चस्व मानले जाते. विवेक कोल्हे हे ज्येष्ठ नेते शंकरराव कोल्हे यांचे नातू तर माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे चिरंजीव आहेत. अहिल्यानगरमधील कोपरगावात काळे-कोल्हे असा जुना संघर्ष आहे. विधानसभा निवडणुकीवेळी आशुतोष काळे यांना राष्ट्रवादी काँग्रेसनं कोपरगावमधून संधी दिल्यानंतर भाजपकडून कोल्हे यांना महायुतीचा धर्म पाळण्याचे आदेश दिले होते. विवेक कोल्हे यांनी काल रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. वाढदिवसानिमित्ताने ही भेट घेतली असल्याची सूत्रांची माहिती होती. नागपूरचे संजय भेंडे भाजपचे अनेक वर्षांपासूनचे कार्यकर्ते आहे. सध्या ते भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष आहेत. यापूर्वी त्यांनी जिल्हा स्तरापासून भाजपच्या संघटनेत अनेक पद भूषविली आहेत. नागपूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये ते नेहमीच नितीन गडकरी यांचे निवडणूक प्रमुख राहिले आहे. याशिवाय ते सहकार चळवळीतही सक्रीय असून नागपूर नागरी सहकारी बँकेचे संचालक राहिले आहे. भाजपने यंदा विधानपरिषदेची संधी देत त्यांच्या पक्षाप्रती कार्याचा सन्मान केला आहे. काँग्रेसच्या विधानपरिषदेच्या आमदारकीचा राजीनामा देत प्रज्ञा सातव भाजपमध्ये दाखल झाल्या होत्या. त्यांच्या रिक्त जागेवर भाजपनं त्यांना उमेदवारी दिली आहे.

--------------------------------

पदाधिकारी उपस्थित होते.खतांच्या लिंकिंगचा प्रश्न अत्यंत जुना आणि जटील आहे. या लिंकिंगमुळे विक्रेते आणि शेतकऱ्यांची मोठी आर्थिक कोंडी होते. अनेक वर्षांपासून हा प्रकार सुरु आहे. यंदाच्या खरिपात लिंकिंगचा प्रश्न सुटला पाहिजे. राज्याच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात लिंकिंग झाले नाही पाहिजे. यासाठी उत्तर प्रदेशच्या धर्तीवर खत कंपन्यांवर अनुदान नसलेली खते, औषधांची विक्री करण्यास बंदी घातली जाईल, अशी घोषणा कृषिमंत्र्यांनी केली.खत विक्रीत नफा किती असावा. खत कंपन्यांनी दुकानदारांना खतांचा साठा पोहोच देणे बंधनकारक असतानाही कंपन्या दुकानदारांकडून वाहतूक खर्च वसूल करतात. खत विक्रीच्या पॉश मशिनबाबत विविध अडचणी आहेत. त्यासह केंद्र सरकारच्या अखत्यारित असलेल्या विविध विषयांवर निर्णय घेण्यासाठी केंद्रीय रसायने आणि खत मंत्री जे. पी. नड्डा यांची शिष्टमंडळासह भेट घेण्यात येईल, अशी माहितीही भरणे यांनी दिली.

------------------------------------

प्रश्न उपस्थित केले. "VSR कंपनीच्या विमान अपघातात तीन महिन्यापूर्वी वडिलांचा मृत्यू झाला, त्याच विमानात मुलगा जातो? त्या VSR कंपनी च्या चौकशीची मागणी करायचे सोडून, त्याच विमानात पार्थ पवार निर्धास्तपणे जातो?", असा सवाल अंजली दमानिया यांनी उपस्थित केला आहे. दमानिया यांनी या पोस्टच्या सोबतीने प्रवाशांची माहिती असणारी शीट देखील जोडली आहे. दमानिया यांनी शेअर केलेल्या शीटनुसार, व्हिएसआर कंपनीच्या विमानाने 28 एप्रिल रोजी मुंबईतून उड्डाण घेतले. आणि हे विमान पुण्यात लँड झाले. या विमानात खासदार पार्थ पवार, राम चौबे, विकास पाटील, धीरज शर्मा आणि अभिषेक बोके यांची नावे आहेत. याशिवाय तीन जणांचा क्रू देखील यात आहे. कू सदस्यांमध्ये तिघेही पुरुष आहेत. दमानिया यांनी सरकारी अधिकाऱ्यांनी खासगी कामासाठी केलेल्या प्रवासावरुनही सवाल उपस्थित केला आहे. "सुनेत्रा पवारांचे ओएसडी राम चौबे आणि विकास पाटील सरकारी अधिकारी असून सरकारी पगार घेतात पण ते पुन्हा एकदा पवारांच्या घरासाठी काम करत आहेत", अशी टीका त्यांनी केली. "हेच ते दोघे पुणे मुंढवा जमीन प्रकरणात पार्थच्या बाजूने उभे होते. तेव्हा ते अजित पवारांचे स्वीय सहाय्यक होते, आता सुनेत्रा पवारांचे आहेत", असे दमानिया यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

------------------------------------------

स्वस्त असताना मोदी सरकारने फायदा करुन घेतला पण, आता तेल महाग झाल्यानंतर जनतेवर भार टाकला जात आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.निवडणुकीच्या काळात दिलेली सूट समाप्त झाली, आता महागाईचा तडाखा बसणार. 29 एप्रिलनंतर पेट्रोल आणि डिझेल दोन्ही महाग होणार आहेत. जेव्हा तेल स्वस्त होते, तेव्हा मोदी सरकारने नफा स्वतःकडे ठेवला होता. आता ते महाग झाले आहे, म्हणून ते त्याचा बोजा तुमच्यावर टाकला जाणार आहे. सरकारने स्वस्त दरांच्या नावाखाली लूटमार केली, ते आता महागाईचा बोजा जनतेवर टाकत आहे", अशी एक्स पोस्ट राहुल गांधी यांनी केली आहे.

----------------------------------

विविध आदेश व परिपत्रके रद्द करून एकत्रित, स्पष्ट आणि सुसंगत असे नवीन धोरण लागू करण्यात आले आहे.आरोग्य विभागातील बदल्या प्रामुख्याने समुपदेशन पद्धतीने करण्यात येणार आहेत. कर्मचाऱ्यांच्या सेवा कालावधी, प्राधान्यक्रम, पसंतीक्रम आणि प्रशासकीय गरज यांचा समतोल साधण्यात येणार आहे. प्रत्येक वर्षी एप्रिल-मे महिन्यात सर्वसाधारण बदल्या करण्यात येतील, विनंती बदल्या वर्षातून दोन वेळा सप्टेंबर आणि डिसेंबरमध्ये विचारात घेतल्या जातील असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.एका कार्यालयातील एकूण कर्मचाऱ्यांच्या 30 टक्क्यांपेक्षा अधिक बदल्या एकाच वेळी होणार नाहीत. याची तरतूद करण्यात आली आहे. दुर्गम व अडचणीच्या भागात दीर्घकाळ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुलभ ठिकाणी बदली देण्यास प्राधान्य दिले जाईल. रिक्त पदांचा समतोल राखण्यावरही भर देण्यात येणार आहे. या धोरणात अपंग, गंभीर आजारांनी ग्रस्त कर्मचारी, विधवा महिला, पती-पत्नी एकत्रीकरण, तसेच शैक्षणिक कारणे अशा विविध मानवी व सामाजिक बाबींनाही प्राधान्यक्रम देण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक अडचणी लक्षात घेऊन न्याय निर्णय घेण्यास मदत होणार आहे. बदली प्रक्रिया पूर्णतः प्रशासकीय स्वरूपाची राहणार आहे.कोणत्याही प्रकारचा राजकीय किंवा बाह्य दबाव आणल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्याची स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. रिक्त पद उपलब्ध नसताना केलेली बदली ही अनियमित मानली जाईल आणि संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित केली जाईल.या सर्वसमावेशक बदली धोरणामुळे सार्वजनिक आरोग्य विभागातील मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक पारदर्शक, गतिमान आणि परिणामकारक होण्यास मदत होणार असून, राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने हा निर्णय महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

-----------------------------------

आंदोलनकर्त्यांनी म्हटले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत संबंधित वक्तव्य झाले असल्याने, ही अवमानना सरकार प्रायोजित आहे का? असा सवाल शिवप्रेमींनी उपस्थित केला. संबंधित प्रकरणात कठोर कारवाईची मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती व राज्यपाल यांना पाठविण्यात आले. नागपूर येथे भारतदुर्गा मंदिराच्या शिलान्यास कार्यक्रमात धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या वक्तव्यावरून राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. संबंधित वक्तव्य ऐतिहासिक सत्याचा विपर्यास करणारे असून शिवरायांचा अवमान करणारे आहे, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, गणेश मस्के,माजी सैनिक अशोक येडे, सय्यद सादेक,रामधन जमाले,शेख मुबीन,बाजीराव ढाकणे, डॉ.संजय तांदळे, प्रा.डी.जी.तांदळे, डॉ. लक्ष्मण पवळ ,प्रविण पालीमकर,अशोक ढोले,शिवाजी हिंदोळे आदी सहभागी झाले होते. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांची वारंवार बदनामी होत असताना शासन निष्क्रिय का? असा सवाल उपस्थित करत ही बदनामी सरकार प्रायोजित आहे का? असा थेट प्रश्न डॉ. ढवळे यांनी उपस्थित केला आणि सरकारचा निषेध नोंदविला.

-----------------------------------

सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सतीश सोळंके आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.रामदास मोराळे रुग्णकल्याण समिती अशासकीय सदस्य प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, सनियंत्रण समिती सदस्य जालिंदर पोकळे, पंचायत समिती सभापती बद्रीनाथ जगताप, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, आष्टीचे नगराध्यक्ष जिया बेग आष्टी विधानसभा मतदारसंघ प्रमुख गणेश नाना शिंदे, माजी सभापती आदिनाथ सानप, पंचायत समिती सदस्य यशवंत खंडागळे उपस्थित होते. पूर्वी आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये दैनंदिन रुग्ण तपासणी ओपीडी अत्यंत कमी होती रुग्ण आल्यास त्याच्यावर थातूरमातूर उपचार करून त्यांना अहिल्यानगर येथे पाठवण्यात येत होते आता यापुढे असले गैरप्रकार होणार नाहीत त्यामुळेच डॉ.रामदास मोराळे यांच्यासारख्या अत्यंत कार्यक्षम आणि सेवाभावी वृत्ती असल्या वैद्यकीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे ग्रामीण रुग्णालयाचा कारभार सोपवला असून रुग्णकल्याण समितीचे सदस्यांनी देखील अत्यंत चांगले काम सुरु केले असल्याचे त्यांनी सांगत यापुढे अत्यंत खर्चिक आणि अहिल्या नगरला जाऊन करावे लागत असलेली डायलिसिस सेवा ठिकाणी सुरु करून रुग्णांचा मनस्ताप आणि खर्च वाचणार आहे असे सांगून आष्टी ग्रामीण रुग्णालयामध्ये आता दुर्बिणीद्वारे गर्भपिशवी काढणे, सिजेरियन प्रसूती, अपेंडिक्स,हर्णिया आणि मुळव्याध या शस्त्रक्रिया, महिलांसाठी आठवड्यातून एकदा सोनोग्राफी, 12 आठवड्यापर्यंत सुरक्षित गर्भपात सेवा, या सर्व सेवा तेही विनामूल्य पद्धतीने होणार असल्यामुळे गोरगरीब जनतेने याचा लाभ घेण्यासाठी ग्रामीण भागातील सर्व कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये जनजागृती व्हावी यासाठी या उपचारांविषयी फलक लावावेत असे आवाहन करून ते म्हणाले की, सध्याची दैनंदिन रुग्ण तपासणी सरासरी 250 वरुन 500 पर्यंत व्हावी अशी आपली अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयाच्या सोयी सुविधांसाठी आपण सतत प्रयत्नशील असून शासन पातळीवर आपण यासाठी पाठवा करत राहू असेही त्यांनी शेवटी सांगितले यावेळी बोलताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीश सोळंके म्हणाले की, आष्टीच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये अत्यंत चांगल्या पद्धतीने डॉ. रामदास मोराळे आणि त्यांचे टीम काम करत असून या रुग्णालयासाठी आवश्यक असणारे कर्मचारी आणि सर्व अडीअडचणी ची पूर्तता करण्यात येईल.. आ.सुरेश धस यांचे मतदार संघातील ग्रामीण रुग्णालयांकडे चांगले लक्ष असल्यामुळे गोरगरीब रुग्णांना चांगली सेवा मिळत आहेत असे सांगितले यावेळी बोलताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे म्हणाले की, अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीमध्ये आपण या ग्रामीण रुग्णालयाचा पदभार घेतला असून दैनंदिन ओपीडी मध्ये वाढ झाली असून सर्व सहकार्यांना सोबत घेऊन यापुढे सर्व प्रकारचे अत्याधुनिक उपचार करून गोरगरीब रुग्णांची सेवा या रुग्णालयाद्वारे करण्याचा प्रयत्न आम्ही करत असून आ.सुरेश धस अण्णा यांच्या सूचनेप्रमाणे या ठिकाणी वीज आणि पाणी या सुविधा उपलब्ध झाल्या असून यापुढे आणखी चांगली सेवा देण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत असे सांगितले रुग्ण कल्याण समितीचे अशासकीय सदस्य यावेळी म्हणाले की, ग्रामीण रुग्णालय हे गोरगरीब जनतेचे आरोग्य मंदिर असून या ठिकाणी आता अत्यंत चांगले पद्धतीची सेवा सुरु झाली आहे आ.सुरेश धस यांच्या पुढील संकल्पनेतून त्यांनी येथील सर्व व्यवस्था चांगली करण्याचा प्रयत्न केला असून रुग्णांच्या सोयी सुविधेसाठी कर्मचार्यांच्या सहकार्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.. या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रसिद्ध कवी प्राध्यापक सय्यद अलाउद्दीन यांनी केले यावेळी.... यांच्यासह ग्रामीण रुग्णालय सहाय्यक अधीक्षक श्री शंकर सोंडगे कनिष्ठ सहाय्यक योगेश सोनवणे परिसेविका श्रीमती बेबी शेख वैद्यकीय अधिकारी डॉक्टर बालाजी गुट्टे डॉक्टर सुरेश ढाकणे डॉक्टर चारुदत्त पवार डॉक्टर नितीन घोडके डॉक्टर भूपेंद्र पन्हाळे डॉक्टर संतोष जावळे डॉक्टर निखिल गायकवाड उपस्थित होते.

-----------------------------------

कुणबी प्रमाणपत्र वाटपाला विलंब होत आहे, यावरुनही जरांगे पाटलांनी नाराजी व्यक्त केली होती. अशातच आज राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उदय सामंत यांनी जरांगे पाटलांची भेट घेतली. यावेळी दोघांमध्ये महत्त्वाच्या मुद्द्यावर चर्चा झाली. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.मनोज जरांगे पाटील आणि मंत्री मनोज जरांगे पाटील या दोघांमध्ये आज कुणबी प्रमाणपत्र वाटप आणि मराठा आरक्षण उपसमितीवर चर्चा झाली. जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटीमध्ये ही चर्चा झाली. जरांगे पाटलांनी मागण्या मान्य झाल्या नाही तर जून महिन्यात आंदोलनाचा इशारा दिला होती. यावरही आज उदय सामंत यांनी भाष्य केले आहे.मनोज जरांगे पाटील यांना भेटल्यानंतर सामंत यांनी म्हटले की, 'आंदोलन होऊ नये यासाठी जे काही निर्णय घ्यावे लागतील ते सरकार म्हणून आम्ही घेऊ. आडमुठेपणाच धोरण जे अधिकारी घेत असतील त्यांना आम्ही समज देऊ. ज्या काही नियमातल्या गोष्टी आहे, त्यानुसार जरागे यांच्या माध्यमातून झालेल्या मागण्या आणि सरकारनेही त्या मान्य केल्या आहेत, त्याची अंमलबजावणी व्हावी हीच आमची इच्छा आहे आणि त्यावरच ही सगळी चर्चा झाली आहे.'काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण उपसमितीवर नाराजी व्यक्त केली होती. 'जी उपसमिती स्थापन झाली आहे त्यांनी मराठ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला हवं, त्यांनी दिखावा करण्यासाठी थातुर मातूर बैठका घेऊ नयेत. मराठे मराठ्यांच्या अंगावर घालण्यासाठी उप समिती नाही. त्याचा अध्यक्ष त्यासाठी नाही, तुमचा माज जिरवण्यासाठी उपसमिती नाही' असं जरांगे पाटलांनी म्हटले होते. यावर बोलताना सामंत म्हणाले की, 'त्यावर सुद्धा आमची चर्चा झालेली आहे, त्यांनी ज्या ज्या अपेक्षा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विखे पाटील यांच्याकडून व्यक्त केल्या आहेत, त्यावर सविस्तर चर्चा झाली आहे.'

--------------------------------------

खुर्चीवर बसावं लागतं तर कधी चटईवर पण बसावं लागतं. चटईवर बसायची ज्याची तयारी असते तो माणूस कायमस्वरुपी खुर्चीवर बसत असतो. मी 4 वेळा निवडून आलो 10 आमदाराचं मी एकटाच काम करतो. मुख्यमंत्र्यांची कृपा झाली तर त्यांची कृपा होणार आहे. मी जर मंत्री झालो तर मी एकटाच दहा मंत्र्यांच काम करेल. जेव्हा मी असे वक्तव्य करतो तेव्हा मुख्यमंत्र्यांकडून मला फोन येतात थांब रे बाबा थांब असं म्हणतात. अशाप्रकारे रवी राणा यांनी पुन्हा एकदा मंत्रिपदाची इच्छा बोलून दाखवली आहे.

-----------------------------------

नेत्याचा माध्यमातून केली. आम्ही यावर विश्वास ठेवत नाही मात्र घराच्या बाहेर 3 पूजा का झाल्या? 27,28 आणि 29 तारखेला उलाढाली का वाढल्या? पवार परिवारावर फार मोठा आघात होवू शकतो अस खरातने एका शेतकऱ्याला सांगितलं होत असा आरोपही रोहित पवार यांनी केला आहे.

## पान 4 वरुन

त्याचे जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित करत या सर्व विकासकामांवर सातत्याने देखरेख ठेवण्याचे निर्देशही मंत्री ॲड. शेलार यांनी प्रशासनाला दिले.जिल्ह्यात बारवांच्या संवर्धनाच्या मोहिमेने वेग घेतल्यानंतर अनेक बारवा उघडकीस आल्या. जिल्ह्यात अशा बारवांचे पुनरुज्जीवन करण्याचे अभियान लोकसहभागाच्या बळावर उत्स्फूर्तपणे झाले. जलव्यवस्थापनाचा हा पारंपरिक वारसा नष्ट होण्याच्या मार्गावर असताना एका लोक चळवळीच्या माध्यमातून हा वारसा जपण्याचे प्रयत्न झाले. राणी सावरगाव (तालुका गंगाखेड) या ठिकाणी असलेली समुद्र विहीर, मानवत येथील अमरेश्वर या प्राचीन शिवमंदिर परिसरात असलेली बारव, वालूर येथील वैशिष्ट्यपूर्ण बारव अशी सांस्कृतिक स्थळे या निमित्ताने चर्चेत आली आहेत.जिल्ह्यातील चारठाणा हे गाव अशा अनेक स्थापत्यांचा समृद्ध वारसा असणारे आहे. चारठाणा येथे हेमाडपंती शिवमंदिर, गोकुळेश्वर, काशीविश्वेश्वर, श्री नृसिंहतीर्थ मंदिर, दगडी बांधकाम असलेली अष्टकोनी बारव, झुलता मनोरा ही महत्त्वाची स्थळे आहेत. यादव कालीन तेराव्या शतकातील हेमाडपंती बांधकाम असलेल्या या मंदिरात वर्षभर भाविकांची वर्दळ असते.सेलू तालुक्यातील वालूर या ठिकाणी असलेल्या बारवेतील गाळ आणि कचरा काढून टाकल्यानंतर त्याठिकाणी आता बारवेचे जे रुप दिसत आहे ते विलोभनीय आहे. पायऱ्यांची अनोखी घडण केवळ अप्रतिम अशी असून स्थापत्याचा तो एक अद्वितीय नमुना मानला जातो.

परभणी जिल्ह्याला संपन्न असा प्राचीन वारसा लाभलेला आहे. जिल्ह्यातील अप्रतिम स्थापत्यशैलीचा पुरावा असणारी हेमाडपंती मंदिरे, बारव नक्कीच बाहेरुन येणाऱ्या पर्यटकांना भुरळ घालणाऱ्या आहेत. काळ्याकभिन्न दगडात अनेक ठिकाणी पारंपरिक जलव्यवस्थापनाचा नमुना म्हणून बारव पाहायला मिळतात. हा सर्व सांस्कृतिक वारसा टिकला पाहिजे यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले जात आहेत.-पालकमंत्री, मेघना साकोरे- बोर्डीकर(परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या संयुक्त उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत जिल्ह्यातील सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखला जाणार असल्याचा निर्णय घेण्यात आला.)

----------------------------------

स्पर्श केला. तसेच म्हणाला की, मुलीचे लग्न जर त्याच्या सोबत केले नाही, तर लैंगिक अत्याचार करण्याची धमकी दिली होती.त्या नंतर ती महिला व तिच्या पतीने याचा त्याला जाब विचारला असता त्याने पुन्हा त्यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करुन धारदार विळ्याने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. या आशयाच्या तक्रारी वरुन आशीष अशोक धिवार याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासी अधिकारी पोलिस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे यांनी आशिष धिवार यास दि. 23 रोजी ताब्यात घेऊन त्याला न्यायालया समोर हजर केले असता न्यायालयाने त्याला दि. 24 एप्रिल पर्यंत दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती.त्या नंतर त्याला दि. 25 रोजी न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली असल्याने त्याची रवानगी ही बीड येथील कारागृहात अरण्यात आली होती. त्याची रवानगी कारागृहात झाल्यानंतर तो त्याची प्रकृती बिघडली आणि त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता दि. 27 एप्रिल रोजी रात्री त्याचा मृत्यू झाला. त्याच्या नातेवाईकांनी असा आरोप केला आहे की, त्याला पोलिसांनी अमानुष मारहाण केली असल्याने त्याला गंभीर इजा झाली. आणि त्यामुळे त्याचा मृत्यू झाला.

----------------------------------

आले आहे. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रा. बी . जी.खाडे, किरण सावजी, जालिंदर गिरी, शेख जावेद, प्रकाश वाघमारे, यमुना पाथरकर, सुनिता ताटे, पद्मीन रणदिवे, सुमित्रा सावंत, हेमा काळे आणि सुवर्णा रेवले आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

-----------------------------------

गोवर्धन गवते, ज्ञानेश्वर दत्ता लाटे (तिघे रा. बेलुरा) आणि सूरज मच्छिंद्र नागरगोजे (रा. लिंबा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींच्या अटकेसाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत. घटनेनंतर पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या ज्ञानेश्वर लाटे याला स्थानिक ग्रामस्थांनी धाडसाने पकडून ठेवले आणि पोलिसांच्या स्वाधीन केले. मात्र मुख्य आरोपी रितेश बहीर याच्यासह अन्य दोघे अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले आहेत. विशेष म्हणजे, आरोपींपैकी रितेश बहीर हा होमगार्ड म्हणून कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे.

----------------------------------

इयत्ता पहिली ची विद्यार्थीनी कु. प्रिती गोरख चव्हाण ही राज्यातून 7 वी व जिल्ह्यातून 2 री आली असून तिचे सर्वत्र कौतुक होत आहे . प्रिती चव्हाण एका रिक्षा चालकाची मुलगी असून अभ्यासात खूप हुशार आहे तसेच जिद्दी, चिकाटी व आवांतर वाचन करते . पुढिल भविष्यात ती यश खेचून आणू शकते . प्रिती चव्हाण हिला रोहिदास राठोड सर, उत्तरेश्वर रोडे सर यांचे मार्गदर्शन लाभले .शाळेचे मुख्याध्यापक श्री . रोहिदास राठोड सर, श्री . उत्तरेश्वर रोडे सर लक्ष्मी आई तांड्याचे सरपंच श्री . स्वरुपराव राठोड, बंडा शेठ राठोड, शा. व्यवस्थापन स . अध्यक्ष श्री . भारत चव्हाण, लहू चव्हाण, राजेंद्र चव्हाण, कोंडिराम चव्हाण, भोजा चव्हाण, विठ्ठल चव्हाण, भिमा चव्हाण, नरहरी चव्हाण, राजू चव्हाण व सर्व शिक्षण प्रेमी नागरिकांनी तिचे स्वागत करून पुढिल शैक्षणिक प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या

--------------------------------------

आहे. भर दुपारीसुद्धा ग्राहक कूलर खरेदी करताना दिसत आहेत. डेझर्ट विंडो कूलरला जास्त मागणीशहरात डेझर्ट विंडो कूलरला सर्वाधिक मागणी असून हे कूलर खिडकीबाहेर बसवले असता अधिक थंड हवा देतात. त्यामुळे ग्राहकांचा कल याच कूलरकडे आहे.कूलरच्या साहित्याच्या वाढलेल्या किमतीमुळे दरात वाढ झाली असून सध्या कूलर 1600 ते 5 हजार रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. 2 फूट ते 4 फूट आकारातील कूलर विक्रीस आहेत. घरांचा आकार लहान असल्याने 2 ते 3 फूट कूलरची मागणी जास्त आहे.'आभा इलेक्ट्रिकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स' येथील विक्रेत्याने सांगितले की, फायबर कूलरपेक्षा डेझर्ट कूलर स्वस्त, टिकाऊ व जास्त गारवा देणारे असल्याने ग्राहक त्यांनाच पसंती देत आहेत.सायंकाळनंतर खरेदीसाठी गर्दीस्टेशन रोड, टॉवर चौक, शिवाजी चौक, नेहरु चौक, गणेशपार या भागांत कूलर खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. विशेषतः सायंकाळनंतर बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ वाढते.

शहराबाहेरील व्यापारीसुद्धा परळीतून कूलर खरेदी करुन घेऊन जात आहेत. काही दुकानांमध्ये ऑर्डरनुसार कूलर तयार करुन देण्याची सुविधाही उपलब्ध असल्याने रात्री उशिरापर्यंत ग्राहकांची गर्दी सुरु असते.

--------------------------------

कन्या चि. सौ. कां.सायली व धारुर तालुक्यातील आसराडोह येथील विष्णू काजगुंडे यांचे चिरंजीव डॉ. अंजिक्य यांचा विवाह सोहळा अतिशय चैतन्यदायी वातावरणात पार पडला. या सोहळ्याचे अतिशय अचूक असे नियोजन करण्यात आले.आदल्या दिवशी विवाह स्थळी हळदीचा कार्यक्रम झाला. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांचे व्यंकटी बिडगर यांच्यासह बिडगर कुटुंबातील सदस्यांनी स्वागत केले. या अभूतपुर्व सोहळ्याचे अतिशय खुमासदार असे सूत्रसंचालन माजी सरपंच चंद्रकांत देवकते यांनी केले. दोन कुटुंबांचा हा स्नेहसोहळा खऱ्या अर्थाने आनंददायी होता. चि. सौ. कां.सायली आणि चि.डॉ.अंजिक्य तुमच्या संसाराची ही नवीन सुरुवात सुख, समाधान आणि भरभराटीची ठरो. तुमची ही जोडी 'लक्ष्मी- नारायणा'सारखी सदैव हसत-खेळत राहो. या विवाह सोहळ्यात शुभ आशीर्वाद देण्यासाठी ह. भ. प. आकाश महाराज शास्त्री, माधवराव दहिफळे, तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना नागरगोजे यांच्यासह नातेवाईक, मित्रपरिवार, सर्व राजकीय पक्षाचे नेते, सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, उद्योग, सांस्कृतिक, वकील, पत्रकार, अनेक सामाजिक व धार्मिक संघटनांचे प्रतिनिधी सर्व प्रकारचे शासकीय, निमशासकीय, कंत्राटी कर्मचारी, युवक वर्ग, जेष्ठ नागरिक, माता भगिनी व मान्यवरांची सोहळ्याला उपस्थित होती. विविध क्षेत्रातील मान्यवर यांनी आजच्या धावत्या युगात, धकाधकीच्या जीवनात प्रचंड उन्हात मोठ्या संख्येने विवाह सोहळ्यास उपस्थित राहून वधू-वरास शुभाशीर्वाद दिल्याबद्दल व त्याचबरोबर या संपुर्ण कार्यक्रमाच्या नियोजनासाठी वेळ देऊन आपला स्वतःचा कार्यक्रम आहे असे समजून प्रत्येक काम करणारे गावातील सर्व सहकारी व बंधूतुल्य मित्र, वडीलधारी नागरिक व सर्व गावकऱ्यांसह सर्वांचे व्यंकटी बिडगर यांनी मनःपूर्वक आभार मानले.

--------------------------------

तपास सुरु असतानाच रविवारी (दि. 26 एप्रिल) दुपारी सुमारे 4 वाजता पुसरा शिवारातील एका शेतात तरुणाचा मृतदेह आढळल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता मृतदेहाची ओळख निवास राठोड अशी पटली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सर्व पुरावे जप्त केले असून मृतदेह अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पाठवण्यात आला.येथे पाच डॉक्टरांच्या विशेष पथकाच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले असून अहवालाची प्रतीक्षा आहे. नातेवाईकांनी या प्रकरणात घातपाताची शक्यता व्यक्त केली आहे. मृतदेह सापडलेले ठिकाण, जवळील रिकामी बाटली आणि अचानक तुटलेला संपर्क या बाबी संशयास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. निष्पक्ष व सखोल तपासाची मागणी त्यांनी केली आहे.

-------------------------------------

विषय नसून तो जाणण्याचा आणि अनुभवण्याचा विषय आहे. प्रत्येकाच्या शरीरातच ईश्वराचा वास आहे. बाह्य जगात शोधण्याऐवजी आपण आपल्या अंतर्यामी डोकावले, तर त्या चैतन्याचा साक्षात्कार होऊ शकतो. श्रीमद् भागवत कथेमुळे मन शुद्ध होते, विचार सकारात्मक होतात आणि अंतर्मनातील सुप्त शक्ती जागृत होण्यास मदत मिळते. दिव्य ज्योति जाग्रती संस्थान, शाखा पाथर्डी यांच्या वतीने गेवराई शहरातील दसरा मैदान, बीड रोड येथे 26 एप्रिल ते 2 मे दरम्यान सायंकाळी 4.30 ते रात्री 8.30 या वेळेत श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या सात दिवसीय धार्मिक सोहळ्यात दररोज विविध आध्यात्मिक विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कथेसाठी संस्थेचे संस्थापक सर्वश्री आशुतोष महाराजजी यांच्या शिष्या तथा प्रख्यात कथा व्यास सुश्री वैष्णवी भारतीजी उपस्थित राहून भाविकांना मार्गदर्शन करत आहेत. रविवारी सायंकाळी दसरा मैदानावर मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात कथेचा शुभारंभ झाला. प्रारंभी भक्तिगीत, भजन आणि कीर्तनाने वातावरण भक्तिमय झाले होते. परिसरात आध्यात्मिक ऊर्जा आणि सकारात्मकता अनुभवायला मिळत होती. या कार्यक्रमाला महिला, पुरुष तसेच युवक-युवतींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. भाविकांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने कथा श्रवणाचा लाभ घेतला. या श्रीमद् भागवत कथेद्वारे समाजात नैतिक मूल्यांची जपणूक, कुटुंबव्यवस्थेची मजबुती आणि अध्यात्मिक जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न असल्याचे संयोजन समितीने सांगितले. अधिकाधिक भाविकांनी या भागवत कथेला उपस्थित राहून आत्मिक समाधानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीच्या पदाधिकार्यांनी केले आहे.

-----------------------------------

अंबाजोगाईतील या तथाकथित राजकारणी , तथा संघटना या केवळ राजकारणापूरत्याच उरल्या आहेत की काय असा सवाल नागरिकांतून व्यक्त केला जात आहे. अंबाजोगाई शहरात आजूबाजूच्या गावातील शेकडो नागरिक दररोज आपल्या दैनंदिन व्यवहार तसेच कामकाजासाठी येत असतात. आलेले नागरिक तिव्र उन्हामुळे तहाणेने व्याकुळ झाल्यावर त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.शहरात कुठेच पणपोईची व्यवस्था नसल्याने ग्रामीण भागातून आलेल्या नागरिकांना पाणी विकत घेऊन पिल्याशिवाय पर्याय नसल्याचे आढळून येत आहे. यामुळे अशा नागरिकांच्या कडून नाराजी व्यक्त केल्या जात आहे.वाढलेल्या उन्हाच्या तीव्रतेची झळ शहरातील छोटे मोठे व्यापारी, हातगाडीवाले, फेरीवाले यांना देखील उन्हाचा फटका बसल्याचे आढळून येत आहे. अंबाजोगाई शहर हे उंचीवर तथा डोंगर रांगानी वेढलेले आहे. शहराचा पारा आजपर्यंतच्या इतिहासात 42 डिग्रीपर्यंत कधीच गेलेला नव्हता. त्यामुळे शहरवासीयांना एवढ्या उन्हाची तीव्रता सहन करण्याची सवय कधीच नव्हती.त्यामुळे आज वाढलेल्या तापमानाची दाहकता नागरिकांना प्रचंड प्रमाणात जाणवत आहे. अशा परिस्थितीत देखील अंबाजोगाई शहर व परिसरात कुठेच पाणपोई उपलब्ध नसल्याने शहरातील विविध राजकीय, सामाजिक संघटना या फक्त आणि फक्त राजकारण करण्यातच मशगुल आहेत का असा संतप्त सवाल अंबाजोगाई शहरवासीय तथा बाहेरून असलेल्या ग्रामस्थांकडून केला जात आहे.यापूर्वीच्या काळात अंबाजोगाई शहरातील विविध पक्ष, मित्र मंडळ, सामाजिक संघटना, राजकीय संघटना या शहरातील प्रमुख तथा गर्दीच्या ठिकाणी पाणपोई उभा करुन आलेल्या नागरिकांची तहान भागवत असल्याचे दिसून येत होते. मात्र ते चित्र अलीकडच्या काळात लोप पावत चालल्याचे आढळून येऊ लागले आहे. यावरून नागरिकांत एकमेकांप्रती असलेले सामाजिक दायित्व लोप पावत चालले आहे की काय असेच वाटू लागले आहे यात मात्र कुठलीही शंका उरली नाही. बघुयात या बातमीची दाखल घेऊन कुठली तरी राजकीय किंवा सामाजिक संघटना तहानलेल्या नागरिकांसाठी पाणी पिण्यासाठी पाणपोईची व्यवस्था करते का?

---------------------------------

हक्क अधिनियम 2015 अंतर्गत नागरिकांना सेवा पारदर्शक, वेळेत व सोप्या पद्धतीने देण्याबाबत सर्वांनी शपथ घेतली. सेवा देताना प्रामाणिकपणा, तत्परता व संवेदनशीलता राखण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही यासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प करण्यात आला.कार्यक्रमात उपस्थितांनी नागरिकांच्या हितासाठी कार्य करताना सेवा हक्काचा आदर राखून अधिक जबाबदारीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले. सुत्रसंचलन प्रा प्रविण फुटके यांनी तर प्रास्ताविक प्रा डॉ अरुण चव्हाण यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------------------------------

आकाशी रंगाचा पंजाबी ड्रेस होता. तिच्या हातात नकली सहा अंगठ्या असून उजव्या हातावर "पूजा" असा टॅटू आहे.

सदर तरुणी कुठे आढळल्यास तात्काळ पिंपळनेर पोलीस ठाण्याशी किंवा सुरजसिंग राजपूत 8766077304 यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

---------------------------------------

युवकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्याचे कार्य ते करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना शेख इम्रान नवाज म्हणाले, "ही जबाबदारी माझ्यासाठी अभिमानाची असून, संघटनेच्या माध्यमातून युवकांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार आहे. मराठवाड्यातील प्रत्येक युवकाला न्याय मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध आहे."दरम्यान, त्यांच्या निवडीबद्दल विविध सामाजिक संघटना, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

----------------------------

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
बुधवार दि. 29 एप्रिल 2026


# परभणी जिल्ह्यातील पुरातन मंदिरे, बारव यांच्या संवर्धनासाठी आखला जाणार कालबद्ध कार्यक्रम

**➲ सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या संयुक्त बैठकीत निर्णय**

परभणी: जिल्ह्यातील पुरातन मंदिरे व बारवा यांचे जतन, संवर्धन करण्यासाठी एकत्रित विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले असून जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा जतन करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या समन्वयातून कालबद्ध कार्यक्रम आखला जाणार आहे. जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या संयुक्त उपस्थितीत पार पडलेल्या मुंबईतील बैठकीतून आज मंगळवारी (दि.28) काही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत.



जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी येथील मंदिर परिसरामध्ये झालेली अतिक्रमणे हटवण्यात यावीत. या कामासाठी जर भूसंपादनाची आवश्यकता असेल, तर जिल्हा प्रशासनाने समन्वय साधून ही प्रक्रिया त्वरित राबवावी. हा संपूर्ण विकास प्रकल्प कालबद्ध कार्यक्रमांतर्गत पूर्ण करावा आणि यासाठी जिल्हा नियोजन समिती व सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या निधीतून समन्वयाने आर्थिक तरतूद करावी, असेही सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी स्पष्ट केले.

राज्याचा ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी शासन कटिबद्ध असून, या विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. सांस्कृतिक वारसा हा राज्याची ओळख असून **पान 3 वर**

# पोक्सोच्या गुन्ह्यातील आरोपी न्यायालयीन कोठडीत मृत्यू

**पोलिसांच्या मारहाणीत मृत्यू झाल्याचा आरोप!**

केज : तुझ्या मुलीचे माझ्या सोबत लावून दे असे म्हणून अल्पवयीन मुलगी आणि तिच्या आईचा विनयभंग करणाऱ्या केज तालुक्यातील आशिष अशोक धिवार या 28 वर्षीय तरुणाचा बीड येथील न्यायालयीन कोठडीत असताना उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. तर त्याचा मृत्यू हा पोलिसांच्या मारहाणीत झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.



केज तालुक्यातील काळे गाव घाट येथील आशिष अशोक धिवार या 28 वर्षीय तरुणावर गावातील एका महिलेच्या आरोपा वरुन असा गुन्हा दाखल करण्यात आला होता की,. दि.18 एप्रिल रोजी सायंकाळी 6:00 वा. च्या सुमारास एक तरुण दारु पिऊन घराचे पाठीमागे लावलेले पत्र्याचे शेडवरुन उडी मारुन आत आला होता. त्याने विवाहित महिलेच्या अंगाशी झोंबाझोंबी केली. त्याचा जाब विचारताच त्याने त्या विवाहितेला शिवीगाळ केली आणि म्हणाला की, "तुझ्या मुलीला माझ्या सोबत लग्न करण्यास सांग." असे म्हणुन मुलीच्या अंगाला वाईट उद्देशाने **पान 3 वर**

# परळीत 1 मे रोजी 'सीटू'चा भव्य कामगार मेळावा; कॉम्रेड किरण मोघे करणार मार्गदर्शन

परळी (प्रतिनिधी):

जागतिक कामगार दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही परळी शहरात 'सीटू' (CITU) संलग्न कामगार संघटनांच्या वतीने भव्य कामगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. 1 मे रोजी परळी वैजनाथ येथील जाजीवाडी विठ्ठल मंदिर येथे दुपारी 1 वाजता हा मेळावा संपन्न होणार असल्याची माहिती 'सीटू'चे अध्यक्ष प्रा. खाडे बी.जी. यांनी दिली आहे.

जागतिक कामगार चळवळीचा इतिहास आणि आपल्या देशातील कामगार चळवळीची सद्यस्थिती याबद्दल कामगारांमध्ये जनजागृती करणे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे. कामगारांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी आणि त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी या मेळाव्याचे आयोजन केले जाते. यावर्षीच्या मेळाव्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्य 'सीटू'च्या सचिव तथा घरकामगार संघटनेच्या राज्याध्यक्षा कॉम्रेड किरण मोघे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कामगारांना त्यांच्या हक्कांची आणि भविष्यातील लढ्याची दिशा समजण्यास मदत होईल.

परळी शहरातील आणि परिसरातील घरकामगार, बांधकाम कामगार, आशा वर्कर्स, शालेय पोषण आहार कर्मचारी आणि सर्व कष्टकऱ्यांनी मोठ्या संख्येने या मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात **पान 3 वर**

# आक्षेपार्ह फोटो व्हायरल केले; तरुणाची भोसकून हत्या

**बीडमध्ये हेलिपॅडच्या जागेवर रक्तरंजीत थरार होमगार्डसह चौघांवर गुन्हा**

बीड : मोबाईलमधील आक्षेपार्ह फोटोच्या कारणावरुन मित्रांनीच एका 19 वर्षीय तरुणाची चाकूने भोसकून हत्या केल्याची धक्कादायक घटना शिरूर कासार तालुक्यातील लिंबा येथे घडली. सुमित गवते, असे मृत तरुणाचे नाव असून, या प्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात एका होमगार्डसह चौघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी रात्री साडेआठच्या सुमारास हेलिपॅडच्या मोकळ्या जागेत हा रक्तरंजित थरार घडला.



मिळालेल्या माहितीनुसार, मृत सुमित गवते (19, रा. बेलुरा, जि. बीड) याने आरोपी रितेश बहीर याच्याशी संबंधित काही आक्षेपार्ह फोटो व्हायरल केले होते. यावरून त्यांच्यात वाद होता. रविवारी रात्री रुस्तुम गवते, ज्ञानेश्वर लाटे आणि सूरज नागरगोजे यांनी सुमितला पकडून धरले, तर रितेश बहीर याने सुमितच्या पोटात चाकूने सपासप वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या सुमितचा अतिरक्तस्त्रावामुळे जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी शहादेव गवते यांच्या फिर्यादीवरुन रितेश सतीश बहीर, रुस्तुम **पान 3 वर**

# प्रीती चव्हाणची मंथन स्पर्धा परिक्षेत भरारी

बीड : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्होबा तांडा येथील विद्यार्थींनी कु. प्रिती गोरख चव्हाण हीने मंथन स्पर्धा परिक्षेत उतुंग भरारी मारली असून ती महाराष्ट्रातून 7 वी व बीड जिल्ह्यातून 2 री येण्याचा बहुमान मिळवला आहे .



तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्होबा तांडा ही शाळा छोट्याशा तांड्यात आहे . शाळेची गुणवत्ता पहिल्या पासूनच असल्याने याठिकाणी पटसंख्या चांगली आहे . या शाळेत शिक्षणाबरोबर क्रिडा वक्तृत्व, सांस्कितिक कार्यक्रम घेतले जातात .या वर्षी 2025 - 2026 मध्ये झालेल्या मंथन स्पर्धा परीक्षेत शाळेतील **पान 3 वर**

# उकाडा वाढल्याने परळीत कूलरची विक्री तेजीत




परळी वैजनाथ / बालाजी ढगे उन्हाच्या चटक्याने अंगाची लाहीलाही होत असल्याने, तसेच रात्रीसुद्धा असह्य उकाडा वाढल्याने आठवडाभरात कूलरच्या विक्रीत अनेक पटींनी वाढ झाली आहे. सध्या परळी शहरातील कूलरच्या मार्केटमध्ये खरेदी व दुरुस्तीसाठी झुंबड उडत आहे.

परळीतील बुद्रे यांचे आभा इलेक्ट्रिकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स' सह विविध दुकानांमध्ये ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. कूलरच्या किमतीत मागील वर्षीच्या तुलनेत शंभर ते दीडशे रुपयांपर्यंत वाढ झालेली असली तरी उकाड्यामुळे विक्री जोरात सुरु आहे.

मागील आठवड्यापासून तापमान वाढत असून फॅनपासून दिलासा मिळत नसल्याने नागरिक कूलर खरेदीकडे वळत आहेत. फॅन कितीही 'स्पीड'वर ठेवला तरी घामाच्या धारा थांबत नाहीत. त्यामुळे गारव्याचा आनंद घेण्यासाठी नागरिकांची कूलर खरेदीसाठी धावपळ सुरु **पान 3 वर**

# दाऊतपुर येथील चि. सौ. कां.सायली व चि.डॉ.अंजिक्य यांच्या विवाह सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती




परळी वैजनाथ ( प्रतिनिधी) :- परळी तालुक्यातील दाऊतपुर येथील कै.माणिकराव बिडगर यांची नात व्यंकटी बिडगर यांची कन्या चि. सौ. कां. सायली व चि.डॉ.अंजिक्य यांचा अत्यंत मंगलमय आणि उत्साही वातावरणात विवाह सोहळा संपन्न झाला. या पवित्र विवाह सोहळ्याला शुभाशीर्वाद देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. अतिशय नियोजनबध्द पध्दतीत पार पडलेल्या या सोहळ्याला हजारोंच्या जनसमुदायाने उपस्थित राहून मान्यवरांनी शुभ आशीर्वाद दिलेत.

परळी वैजनाथ शहरातील बारा ज्योतिर्लिंगा पैकी एक श्री प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या जवळील हालगे गार्डन येथे मंगळवार दि.28 एप्रिल रोजी दिग्गज नेते मंडळी, ह.भ.प.संत महंत मंडळी व सर्वस्तरातील हजारों जनता जनार्धनाच्या साक्षीने बिडगर व काजगुंडे परिवाराचा अतिशय नेत्रदिपक व अभुतपूर्व असा शाही विवाह सोहळा पार पडला. परळी वैजनाथ तालुक्यातील दाऊतपूर येथील व्यंकटी बिडगर यांच्या **पान 3 वर**

# वडवणी तालुक्यात तरुणाचा मृतदेह आढळला

**नातेवाईकांनी या प्रकरणात घातपाताची शक्यता व्यक्त केली आहे.**

वडवणी : वडवणी तालुक्यातील पुसरा शिवारात चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या तरुणाचा संशयास्पद अवस्थेतील मृतदेह आढळून आला. निवास राठोड (35) असे या तरुणाचे नाव असून या प्रकरणात सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे.



तिगांव ग्रामपंचायत हद्दीतील गांडगे वस्ती येथील रहिवासी निवास गोविंद राठोड (वय 35) हे आयुर्वेदिक औषध विक्रीचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. शांत, मनमिळावू स्वभावामुळे ते गावात परिचित होते. गुरुवार, 23 एप्रिल रोजी सकाळी ते नेहमीप्रमाणे घराबाहेर पडले; मात्र रात्रीपर्यंत परत न आल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. कुटुंबीयांनी स्वतःच्या पातळीवर शोध घेतला. मोबाईलवर संपर्क साधण्याचे अनेक प्रयत्न निष्फळ ठरले.

नातेवाईक, मित्रमंडळी आणि गावकऱ्यांनी परिसरातील गावांमध्ये, ओळखीच्या ठिकाणी तसेच रुग्णालयांमध्ये चौकशी केली; मात्र काहीही धागेदोरे मिळाले नाहीत. अखेर पत्नी संगीता राठोड यांनी 25 एप्रिल रोजी वडवणी पोलिस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरु केली.

मोबाईल लोकेशन, संपर्कातील व्यक्ती यांचा **पान 3 वर**

# ईश्वर मानायचा नाही तर जाणायचा – सुश्री वैष्णवी भारतीजी



गेवराई : आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे समाजात असंतोष, क्लेश आणि मानसिक ताण मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक व्यक्तीला आत्मिक समाधान, मानसिक स्थैर्य आणि आध्यात्मिक उर्जेची नितांत गरज आहे. यासाठी प्रत्येकाने कुटुंबासह श्रीमद् भागवत कथेस उपस्थित राहून अध्यात्माचा अनुभव घ्यावा, असे प्रतिपादन दिव्य ज्योति जाग्रती संस्थानच्या कथा व्यास सुश्री वैष्णवी भारतीजी यांनी केले.

त्या पुढे म्हणाल्या की, ईश्वर हा केवळ मानण्याचा **पान 3 वर**

# 41C तापमानात तहानलेले अंबाजोगाई; पाणपोई कुठे गायब?

**● उन्हाने नागरिक हैराण, तरीही पाणपोईसाठी लोकप्रतिनिधी तथा विविध संघटना उदासीन**

अंबाजोगाई : गोविंद खरटमोल सध्या उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना दिसून येत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात उन्हाची लाट पसरली आहे. अशाच उन्हाच्या लाटेची झळ अंबाजोगाई व शहरवासीय सोसत आहेत. कधी नव्हे ते अंबाजोगाई शहरातील उन्हाचा पारा 41 ते 42 डिग्री पर्यंत जाऊन पोचला आहे. मात्र अशात देखील अंबाजोगाई शहर व परिसरातील राजकीय नेते, त्याचबरोबर शहरात



वावरणाऱ्या विविध राजकीय तथा सामाजिक संघटना शहरात कुठेही नागरिकांसाठी पाणपोई उभी करण्याबाबत उदासीन असल्याचे दिसून येत आहेत. यावरून **पान 3 वर**

# लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात 'सेवा हक्क दिन उत्साहात साजरा




परळी वैजनाथ दि.28 (प्रतिनिधी) येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 च्या अंमलबजावणीस दहा वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 28 एप्रिल रोजी "सेवा हक्क दिन" उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अधिकारी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सेवा हक्काची शपथ घेतली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका छाया पत्की या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे तसेच प्रा. डॉ. अरुण चव्हाण यांची उपस्थिती होती. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा **पान 3 वर**

# मैंदा येथून अंदाजे 18 वर्षीय तरुणी बेपत्ता; परिसरात खळबळ

वडवणी प्रतिनिधी:

बीड तालुक्यातील मैंदा येथून 18 वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. पूजा बाबूसिंग राजपूत (वय अंदाजे 18) असे बेपत्ता तरुणीचे नाव आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, तिचा भाऊ सुरजसिंग बाबूसिंग राजपूत (वय 27, मूळ राहणार लातूर, सध्या मुक्काम मैंदा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक 23 एप्रिल 2026 रोजी रात्री कुटुंबीय जेवण करून झोपले होते. पहाटे साधारण 3.30 वाजण्याच्या सुमारास पूजा अंथरुणात दिसून आली नाही. त्यानंतर कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला, मात्र ती कुठेही आढळून आली नाही.

या प्रकरणी दिनांक 27 एप्रिल 2026 रोजी पिंपळनेर पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

बेपत्ता तरुणीचे वर्णन असे: रंग काळा-सावळा, उंची सुमारे 5 फूट, अंगाने मध्यम बांधा, अंगावर **पान 3 वर**

# युवक नेतृत्वाला नवी दिशा : शेख इम्रान नवाज यांची मराठवाडा संघटकपदी निवड

वडवणी प्रतिनिधी सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनेच्या मराठवाडा संघटकपदी शेख इम्रान नवाज यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे मराठवाडा विभागातील युवकांना सक्षम नेतृत्व मिळाल्याची भावना व्यक्त होत असून, संघटनेच्या कार्यात नवसंजीवनी मिळणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.



शेख इम्रान नवाज हे मागील काही वर्षांपासून सामाजिक व राजकीय युवक संघटनात्मक कार्यात सक्रिय असून, त्यांनी विविध प्रश्नांवर ठोस लढा उभारला आहे. सामाजिक समतेसाठी त्यांनी घेतलेली भूमिका विशेष लक्षवेधी ठरली आहे. युवकांना एकत्र आणून त्यांना योग्य दिशा देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे.

त्यांच्या निवडीमुळे संघटनेच्या मराठवाडा पातळीवरील कामकाजाला अधिक बळ मिळणार असून, ग्रामीण व शहरी भागातील युवकांपर्यंत संघटनेची पोहोच वाढण्यास मदत होणार आहे. संघटनेचे विचार व उद्दिष्टे **पान 3 वर**




**● अंबाजोगाई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्री कैलास जी बळवंत साहेब यांचा सत्कार करीत असताना रणधुमाळी संपादक कैलास डुमने**